## SHORT BRIEF OF INCIDENT

| | | |
|---|---|---|
| 1. | MESCO No 06508 RAJGOUNDA BABU PATIL, MESCO No 05421 VIJAY SOMNATH KHANDEKAR, MESCO NO 04093 CHAKURE AYUB AND MESCO NO 05472 SULGEKAR ANIL BHARMU | **MSEDCL ADMINISTRATIVE BUILDING, RASTA PETH, PUNE** – 22 Security Guards of MESCO are posted at ADMINISTRATIVE BUILDING, RASTA PETH, PUNE Divisional Office of MSEDCL and MSETCL. On 06 Jul 2023 at 0430hrs in the early morning, MESCO Security Guard 04093 CHAKURE AYUB noticed smoke coming out from first floor of main building. He immediately started to blow whistle and thereafter gathered all existing on duty Security Guards at **MSEDCL ADMINISTRATIVE BUILDING, RASTA PETH, PUNE** and firstly turned off electric supply of building thereafter applied fire extingushers to control the fire due to electric short circet. They in turn saved important documents of **MSEDCL ADMINISTRATIVE BUILDING, RASTA PETH, PUNE** from burning and stoped further spread of fire in the main building, their act of sincerety, alertness and decisiveness was appreciated by CE, **MSEDCL ADMINISTRATIVE BUILDING, RASTA PETH, PUNE ZONE.** Photographs and article is attached. |

Regional Manager
Pune Region
MESCO

## हरपवडे गावातील धनगरवाडा झाला स्वातंत्र्य दिनी प्रकाशमान



धनगरवाड्याचे विद्युतीकरण, सोबत ग्रामस्थ दिसत आहेत.

ात्येक घर प्रकाशमान व्हावे' हाच महावितरणचा ध्यास आहे. तोच ध्यास कृतीत तरवत गडहिंग्लज विभागातील आजरा तालुक्यातील हरपवडे गावाशी संलग्न नगरवाडा स्वातंत्र्य दिनी प्रकाशमान झाला आहे. लोकप्रतिनिधी व जिल्हा शासनाच्या सहकार्यातून महावितरणने ही कामगिरी केली आहे.

या धनगर वाड्यात २५ कुटुंबाचा रहिवास आहे. दळण वळणापासून वंचित, त्यंत दुर्गम व वनविभागाच्या क्षेत्रातील हा धनगरवाडा प्रकाशमान करण्यासाठी त्रणेने अथक परिश्रम घेतले आहेत. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या धीतून हा धनगरवाडा प्रकाशमान करण्यासाठी ६३ केव्हीए क्षमतेच्या वितरण हित्र उभारणीचे काम करण्यात आले. चिखल वाट तुडवीत हाताने खेचून वितरण हित्र पोहचविण्याचे कठीण कार्य जनमित्रांसह कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांनी केले.

या कामी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री. राहुल रेखावार, आमदार श्री. प्रकाश ाबिटकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे, ड़हिंग्लज विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. विजयकुमार आडके यांच्या र्गदर्शनाखाली आजरा उपविभागीय अभियंता श्री. सुहास मिसाळ, शाखा अभियंता . शरद पाटील व जनमित्रांनी ही कामगिरी यशस्वीपणे पूर्ण केली. याबद्दल मुख्य भियंता श्री. परेश भागवत यांनी सबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

## धोकादायक परिस्थितीत चोख कामगिरी; पुण्यातील अभियंता, कर्मचाऱ्यांचा गौरव



आयुक्त श्री. शेखर सिंह यांच्याहस्ते गौरव स्विकारताना सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे.

पुणे परिमंडलातील निगडीमधील भक्तीशक्ती चौकात एलपीजी गॅसचा टँकर उलटल्यानंतर संभाव्य धोका टाळण्यासाठी सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे व सहकाऱ्यांनी केलेल्या कामगिरीची दखल घेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री. शेखर सिंह यांच्याहस्ते पालिकेच्या सभागृहात नुकताच गौरव करण्यात आला.

निगडीमधील कै. मधुकरराव पवळे पुलाजवळ मुंबईवरून पुण्याच्या दिशेने जाणारा भारत पेट्रोलियमचा एलपीजी गॅस टँकरला पहाटे अपघात झाला होता. टँकरमध्ये १८ टन गॅस असल्याने संभाव्य धोका टाळण्यासाठी पोलीस विभागाकडून महावितरणला वीजपुरवठा बंद करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार महावितरणकडून निगडी गावठाण, सेक्टर २४ व २६ तसेच साईनाथनगर परिसरातील पहाटे पाच वाजता चार रोहित्रांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला होता. तसेच सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे तसेच जनमित्र सर्वश्री प्रशांत माळोदे, जितेंद्र सारंगधर, गोपाळ गिरी व किरण नलगे यांनी त्याच ठिकाणी दिवसभर उपस्थित राहून कर्तव्य बजावले होते. सुदैवाने सर्व यंत्रणेच्या योग्य समन्वयामुळे अपघातग्रस्त टँकरपासून मोठा धोका टळला. महावितरणच्या या कामगिरीची दखल घेत महानगरपालिकेचे आयुक्त श्री. शेखर सिंह यांच्याहस्ते सहायक अभियंता श्री. संतोष झोडगे यांचा गौरव करण्यात आला.

✠✠✠

# पुणे परिमंडल कार्यालयातील चार सुरक्षारक्षकांचा गौरव



क्षा रक्षकांचा गौरव करताना मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, सोबत इतर मान्यवर

समयसूचकता व चोख कर्तव्य बजावणाऱ्या पुणे परिमंडलाच्या रास्तापेठ येथील प्रशासकीय इमारतीमधील चार सुरक्षारक्षकांचा मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. काही दिवसांपूर्वी पहाटे चारच्या सुमारास प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका कार्यालयात शॉर्टसर्किट होऊन धूर निघत होता. दरम्यान इमारत व परिसरात गस्त घालत असताना या धुराच्या गंधावरून रात्रपाळीचे सुरक्षा रक्षक सर्वश्री विजय खांडेकर, संजीव मोपरे, अयुब चाकुरे व अनिल सुळगेकर यांनी समयसूचकता दाखवत तातडीने संबंधित कार्यालयात गेले व वीजपुरवठा खंडित केला. तसेच आग लागण्याच्या बेतात असताना ती विझवली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

या कामगिरीची दखल घेऊन या चारही सुरक्षा रक्षकांचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी कौतुक केले. तसेच शाल, श्रीफळ व प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरव केला. यावेळी स्थापत्य विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. संजीव नेहेते, कार्यकारी अभियंता श्री. विजेंद्र मुळे, 'मेस्को'चे पर्यवेक्षक श्री. संजीव मोपरे आदींची उपस्थिती होते.

✠✠✠


महावितरण


महावितरण


YOU ARE UNDER CCTV SURVEILLANCE
महावितरण


YOU ARE
UNDER CCTV
SURVEILLANCE
महावितरण





